दैनिक महा माझा

# कलाईमामणी बाला देवी चंद्रशेखर या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या भरतनाट्यम

नृत्यांगना, संशोधक, नृत्यदिग्दर्शिका आणि विचारवंत आहेत. गेली चार दशके त्यांनी भारतीय शास्त्रीय नृत्याची समृद्ध परंपरा जगभर पोहोचविण्याचे कार्य अविरतपणे केले आहे. जगातील चाळीसहून अधिक देशांमध्ये तीनशेहून अधिक सादरीकरणे, प्रतिष्ठित विद्यापीठांमधील व्याख्याने, तसेच युनेस्कोच्या मुख्यालयासह अनेक आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर त्यांनी भारतीय संस्कृतीचे प्रभावी प्रतिनिधित्व केले आहे. परंपरेचा गाभा जपत आधुनिक समाजाशी संवाद साधण्याची त्यांची शैली त्यांना वैशिष्ट्यपूर्ण बनवते.




भरतनाट्यमच्या माध्यमातून आध्यात्मिकता, तत्त्वज्ञान, इतिहास आणि मानवी मूल्ये यांचा सेतू उभारणे हे बाला देवी चंद्रशेखर यांच्या कार्याचे वैशिष्ट्य आहे. माऊली – एक कालातीत परंपरा, नंदनार चरित्रम्, उद्धवगीता, कृष्णार्पणम्, कर्ण, बृहदीश्वर अशा अनेक संकल्पनात्मक नृत्यनिर्मितींमधून त्यांनी भारतीय संतपरंपरा, भक्ती आणि सांस्कृतिक वारसा रसिकांसमोर अत्यंत प्रभावीपणे साकारला आहे. त्यांचे संशोधन आणि सर्जनशील दृष्टीकोन यांमुळे त्या केवळ नृत्यांगना नसून भारतीय कलाविश्वातील एक महत्त्वपूर्ण विचारवंत म्हणूनही ओळखल्या जातात.

माऊली – एक कालातीत परंपरा ही त्यांची नृत्यरचना महाराष्ट्राच्या वारकरी संप्रदायातील अखंड भक्ती, संतपरंपरेचे तत्त्वज्ञान आणि श्री विठ्ठलावरील अनन्य श्रद्धा यांना समर्पित आहे. संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, जनाबाई, चोखामेळा आणि इतर संतांच्या अभंगांमधून प्रकट होणारा भक्तीचा संदेश या निर्मितीत नृत्य, संगीत, साहित्य आणि अध्यात्म यांच्या अप्रतिम संगमातून साकारला जातो. भारतीय सांस्कृतिक वारशाचे वैश्विक महत्त्व अधोरेखित करणारी ही कलाकृती प्रेक्षकांना केवळ एक नृत्यप्रयोग न वाटता, आत्मानुभूतीचा आणि भक्तीच्या दिव्य प्रवासाचा अविस्मरणीय अनुभव देणारी ठरते.